**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ यांचा शपथेवर जबाब</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः-रमेश सहदेव चव्हाण

वय ५९ वर्षे, धंदाः-सेवानिवृत्त,

रा. नेमळे, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ. डी.व्ही.गोवेकर यांचेतर्फे-</u>**

०१. मी, माझी पत्नी व मुलगा यांचेसहीत नेमळे येथे राहणेस आहे. माझ्या घरा शेजारी माझा भाऊ लहू चव्हाण, त्याची बायको वैशाली चव्हाण, मुलगा सिध्देश चव्हाण व मुलगी प्रियांका राहते. दि.२२/११/२०२२ रोजी मी नवीन घराच्या पाठीमागे काम करत होतो व माझी सून जुन्या घराच्या अंगणात पायरीवर बसली होती. तेवढयात सिध्देश चव्हाण हा हातात कचऱ्याची पिशवी घेऊन आला व अंगणात सगळा कचरा केला आणि त्याने लघुशंखा केली. तेथे माझी सून बसलेली होती. मी जाऊन त्याला विचारले त्यावेळी त्याने मला व माझ्या सुनेला अश्लील शिवीगाळ केली. त्यानंतर मी पोलीसांना फोन करुन सांगितले व संध्याकाळी पोलीस आले व त्यांनी त्याला समज दिली. त्यामुळे आम्ही काही पोलीस कप्लेंट केली नाही. पहीली घटना ०५.३० ते ०५.४५ वाजताच्या दरम्यान घडली. त्यानंतर त्याच दिवशी रात्री ०८.३० ते ०८.४५ वाजताच्या दरम्याने लहू चव्हाण, त्याची पत्नी, त्याची मुलगी तिघेजण येऊन जुन्या घराकडे भांडण करायला निघाले व सुनेच्या व माझ्या मुलाच्या अंगावर निघाले. 'आम्ही अंगणात काहीही करु, संडास केला तरी तुम्ही तो खावा' असे म्हणाले व अश्लील शिवीगाळ केली व घरी निघून गेले. दुसऱ्या दिवशी माझ्या सुनेने पोलीस कप्लेंट केली. मी आरोपींना पाहिलेस ओळखू शकतो. आज रोजी न्यायालयात तीन आरोपी बसलेले असून दुसऱ्या आरोपीस पाहिलेस ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. के. निरवडेकर यांचेमार्फत-</u>**

०२. मी दि.२२.११.२०२२ रोजी पोलीसांना ०५.३० वाजताच्या दरम्यान कॉल केला

होता. फोन कोणत्या पोलीसांनी घेतला त्यांचे नांव मला सांगता येत नाही. तसेच घटनास्थळी जे पोलीस आले होते त्याचे नांव मला सांगता येत नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे पोलीस घटनास्थळी ०७.१५ वाजताच्या दरम्याने आले. पोलीस घटनास्थळी आल्यानंतर मी किंवा माझ्या सुनेने अंगणात ज्या ठिकाणी कचरा टाकला तो किंवा ज्या ठिकाणी आरोपीने लघुशंका केली ते ठिकाण पोलीसांना दाखविले असे घडले नाही.

**प्रश्नः**– पोलीस आल्यानंतर घटनेबाबत तुमच्याकडे व तुमच्या सुनेकडे चौकशी केली का?

**उत्तरः**– ते आरोपींकडे गेले, त्यांना सांगितल्यानंतर त्यांनी आम्हांला येऊन त्यांना समजावून सांगितले आहे असे सांगितले.

मी पोलीसांना फोन केला त्यावेळी घटनेचा प्रकार सांगण्याचा प्रयत्न केला. पोलीस घटनास्थळी आले तेंव्हा साधारण ५ मिनिटे थांबले. पोलीस घटनास्थळी आल्यानंतर आरोपी व आम्हांला बोलावून तपासकाम केले असे घडले नाही. सदर दिवशी पोलीसांनी माझे टिपण नोंदविले नाही. पोलीसांनी आमच्या समक्ष आरोपींना समज दिली असे काही घडले नाही.

**प्रश्नः**– पोलीसांना तुम्ही किंवा तुमच्या सुनेने कचरा टाकल्याचे ठिकाणी किंवा आरोपीने लघुशंका केल्याचे ठिकाण स्वतःहून दाखविण्याचा प्रयत्न केला का?

**उत्तरः**–आम्ही दाखविण्याचा प्रयत्न केला परंतु पोलीसांनी उद्या पाहू, असे सांगितले.

हे म्हणणे खरे आहे की, उपरोक्त दिवशी पोलीस आल्यानंतर आमच्या समक्ष कोणतीही लिखापट झालेली नाही. पोलीस तेथून ५ मिनिटात निघून गेले.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमचेत जमीनीच्या जागेवरुन अनेक वर्षे बोलाचाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचेत व आरोपींचेत जमीनीवरुन वाद चालू आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमचेविरुध्द फौजदारी केसेस दाखल केलेल्या असून त्या प्रलंबित आहेत.

०४. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात सांगितेलेला मजकूर म्हणजेच

'दि.२२/११/२०२२ रोजी मी नवीन घराच्या पाठीमागे काम करत होतो व माझी सून जुन्या घराच्या अंगणात पायरीवर बसली होती, तेवढ्यात सिध्देश चव्हाण हा हातात कचऱ्याची पिशवी घेऊन आला व अंगणात सगळा कचरा केला आणि त्याने लघुशंखा केली, तेथे माझी सून बसलेली होती, मी जाऊन त्याला विचारले त्यावेळी त्याने मला व माझ्या सुनेला अश्लील शिवीगाळ केली, त्यानंतर मी पोलीसांना फोन करुन सांगितले व संध्याकाळी पोलीस आले व त्यांनी त्याला समज दिली, त्यामुळे आम्ही काही पोलीस कप्लेंट केली नाही, पहीली घटना ०५.३० ते ०५.४५ वाजताच्या दरम्यान घडली' हे मी खोटे सांगत आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात सांगितेलेला मजकूर म्हणजेच 'त्यानंतर त्याच दिवशी रात्री ०८.३० ते ०८.४५ वाजताच्या दरम्याने लहू चव्हाण, त्याची पत्नी, त्याची मुलगी तिघेजण येऊन जुन्या घराकडे भांडण करायला निघाले व सुनेच्या व माझ्या मुलाच्या अंगावर निघाले, 'आम्ही अंगणात काहीही करु, संडास केला तरी तुम्ही तो खावा' असे म्हणाले व अश्लील शिवीगाळ केली व घरी निघून गेले, दुसऱ्या दिवशी माझ्या सुनेने पोलीस कप्लेंट केली' हे मी खोटे सांगत आहे.

०६. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षात कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपती वरुन वाद असलेने आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचा व आरोपींचा काहीही संबंध नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.08.21 17:52:59 +0530

दिनांकः-२१/०८/२०२४

(श्रीमती आर.जी.कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.